Vol 6 Issue 9 October 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor :4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# बंदीश : एक सूक्ष्म अवलोकन

डॉ. सौ. अर्चना माधव अंभोरे
सहयोगी प्राध्यापक, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.




सारांश (Abstract):
हिंदुस्थानी रागसंगीताचे दोन मुख्य आधार आहेत. १) बंदिश २) उपज. कंठसंगीतात बंदिशीस अनन्य साधारण महत्त्व आहे. संगीत समिक्षेच्या दृष्टिकोनातून देखील 'बंदिश' विषयाचे महत्त्व आहे. रागगायनाचे महत्वाचे साध्य म्हणजे रसाविष्कार आहे. रसाविष्कार साधायचा असेल तर स्वर, लयीबरोबरच शब्द या पूरक घटकाचा उपयोग केल्यास रागगायन परिणामकारक होते.
प्रस्तुत शोधनिबंधात 'बंदिशीचा' विचार केवळ ख्याल विधेच्या संदर्भात केला गेला आहे.

बीजशब्द : ख्याल, बंदिश, मातू, धातू, स्वर, लय, मुखडा, रागालाप.

## गृहितक :

१)ख्यालाची बढत करतांना केवळ काही शब्दाधार देणे हेच बंदिशीचे कार्य आहे.
२)बंदिशीत काव्य गुण असणे आवश्यक आहे.
३)ख्यालगायनात बंदिशीची शब्द रचनाच सर्व काही नसते तर स्वरपक्ष प्रबख असतो.

## प्रास्ताविक :

'बंदिश' मुळत: फारसी शब्द आहे. पं. रामचंद्र वर्मा यांच्या मते' -
१)बंदिश म्हणजे बांधण्याची क्रिया किंवा भाव
२)गांठ
३)छंदाची रचना
४)उपाय
५)दोषारोपण

परंतु कंठसंगीताच्या संदर्भात केवळ वरील तीन अर्थ उपयुक्त आहेत.
१)'अभिजात संगीतास उपयुक्त गेय शब्दरचना करण्याच्या प्रक्रियेस 'बंदिश म्हणता येईल.'२
२)विशिष्ट रागातील स्वर घेऊन एखाद्या तालामध्ये शब्द आणि स्वरांचा मेळ घालून केलेली रचना म्हणजे 'बंदीश'.
३)आचार्य शारंगदेवांनी बंदिशींचे दोन अंग स्पष्ट केलेले आहेत.
१)वाक्- भाषा
२)गेय - स्वर, लय, ताल.
४)रागगायन अधिक परिणामकारक व्हावे, योग रसाविष्कार करण्यासाठी स्वर, लय, शब्द या पूरक घटकांचा वापर करून निर्माण केलेली रचना म्हणजे 'बंदीश'.

## बंदिशीचा ऐतिहासिक आढावा :

१)सामगायनातील ऋचांना बंदिशींचे बीजरुप म्हणता येईल.
२)जातीगायनाच्या रचना या चार चार ओळींची कवने होती.
३)प्रबंधगायनात उद्ग्राह, ध्रुव, मेलापक, आभोग अंतरा असे धातू आणि स्वर, पद, तेन, बिरुद, पार ताल ही अंग असत. ही रचना म्हणजे बंदीश होऊ शकते.
४)धृपद शैलीत स्थायी, अंतरा, संचारी, आभोग अशी चार भागांची बंदिश आढळते.

## थोडक्यात -

'ख्याल गायन शैलीतील बंदीश प्राचीन काळापासून होती' असे आपण म्हणू शकतो.
धृपद, धमार, ख्याल, टप्पा, ठुमरी इ. शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीताच्या विधांचे कार्य विभिन्न आहे, ते म्हणजे रागस्वरुपास विभिन्न दृष्टिकोनातून स्पष्ट करणे. रागरुपास स्पष्ट करणे हा प्रमुख उद्देश ह्या सर्व विधांचा आहे.
ख्यालाचे स्थान शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीत विधांच्या मधोमध आहे. धृपद आणि ठुमरीच्या मधोमध ख्याल आहे. ऐतिहासिक अवलोकन केले असता लोकप्रियतेच्या चरम सीमेवरून धृपद उतरु लागले त्यावेळी सदारंगाने ख्याल शैली अविष्कृत केली. संगीत रत्नाकराचे वेळी 'रुपकालाप' नावाचे रागविस्ताराचे दुसरे रूप उपेक्षित राहिले त्यास सदारंगांनी पुन्हा प्रतिष्ठित करून ख्याल शैली निर्मिली.

रूपकालापच ख्याल गायकीचे मुख्य तत्त्व आहे. ख्यालात प्रयुक्त, स्वररचना किंवा बंदिशीचे 'स्वरमयी रूप' ती आकृती आहे. बंदीशीचे स्वररुपच रूपकालापाच्या आधारासाठी असते. स्वररचनेची बढत करण्यासाठी बंदीश आधार रूप राहिल्याने कलाकाराच्या प्रतिभेस राग विस्तार करण्याची संधी मिळत असते. बंदिशीचा आधार घेऊन आविर्भाव, तिरोभाव, विविध काकु स्वरांचा प्रयोग करण्याची सूट कलाकाराला मिळते. रूपकालापाचे हेच वैशिष्ट्य आहे. रागनियमाच्या बंधनांना मानून कलाकारांना योग्य स्वातंत्र्य मिळते.

रूपकालापाचा आधार 'बंदीश' आहे. ख्यालगायनात रुपकालापच प्राणतत्त्वाच्या रूपात असते. ख्यालात बंदिशीच्या सहाय्याने रागविस्तार करणे अपेक्षित असते.

### ख्याल अंगाची बंदिश :

ख्यालाच्या बंदिशीच्या मांडणीत स्थायीचा विस्तार करीत समेवर येण्याची क्रिया अत्यंत आकर्षक असते. बंदिशीच्या स्थायी अंगात रागाची पकड, चलन, वादी संवादी, मुख्य रागांग, विषय आणि विषयातील भावानुरुप लय यांचा सूक्ष्म विचार केलेला आढळतो.

१)स्थायीतील काव्याच्या शब्दाधारे रागविस्तार करणे.
२)एक-एक सूराची बढत करीत अंतऱ्याकडे जाणे.
३)स्थायी अंगाचा मुखडा समेपुरता वापरून बाकी रागविस्तार आकारात करणे.
४)बंदिशीच्या आधारे बोल बाँट, बोलबनाव करीत स्थायीची मांडणी करणे.

### बंदिशीतील सौंदर्य स्थळ :

समेवर येण्याची प्रक्रिया संगीतातील वारंवार येणारे एक सौंदर्य स्थळ आहे. विविध रीतिने सादर झाल्याने त्याची श्रवणीयता नित्य नवी असते. बंदिशीच्या मांडणीत ही क्रिया फार महत्त्वाची आहे.

### बंदिशीतील लय विचार :

लयकारीच्या विविध प्रकारांनी प्रस्तुतीला अधिक आकर्षकता येते. संगीताचे लयीशी अतूट नाते आहे.

१)बंदिशीमधून प्रतिबिंबित होते ते राग स्वरुप.
२)बंदिशीतील साहित्यिक मूल्ये व शब्दांची निवड.
३)ताल-लय-मात्रा यांचा बंदिशीमध्ये सौंदर्याच्या दृष्टिने केलेला विचार.

विचार तीन बाबी चांगल्या बंदिशीमध्ये असतात.

### बंदीशीचे कार्य :

१)प्रतीत होणाऱ्या अमूर्त सौंदर्याला साकार किंवा मूर्त रुप प्रदान करणे.
२)प्रतीत सौंदर्याकृतीच्या सविस्तार अभिव्यक्ति करण्यास एक 'सर्जक' केंद्र प्रदान करणे.
३)सौंदर्याकृतीस एक स्थिरपद रुप देऊन त्यास सुरक्षित करणे.
४)कला संवर्धन करण्यास कारणीभूत होणे.

### आदर्श बंदीश :

आचार्य नि:शंक शारंगदेवांनी 'संगीत रत्नाकर' ग्रंथात (१३ व्या शताब्दी) गीताचे गुण वर्णिलेले आहेत. त्या गुणांनी युक्त बंदिशीस आदर्श बंदिश म्हणता येईल. ते १० गुण पुढील प्रमाणे -

व्यक्तं पूर्ण प्रसन्नंच, सुकुमारमलंकृतम् ।
समं सुरक्तं श्लेक्ष्णंच विकृष्टं मधुरं तथा ।
दशैते स्युर्गुणा गीते तत्र व्यक्तं स्फुटै: स्वरै: ।।
(चौथा अध्याय, श्लोक ३७४)

### पं. कुमार गंधर्वांच्या मते -

'जी बंदिश चांगल्या प्रकारे गायल्या जाऊ शकेल तिला मी आदर्श बंदिश मानतो.३

### बंदीशीची उपयुक्त लक्षणे -

बंदीशीत तीन घटक असणे अत्यावश्यक आहे.

१) वाक् (भाषा)
२) गेय (राग भाव)
३) वलय (ताल)

बंदीशीतील सौंदर्याचा विचार करतांना बंदिशीत खालील सांगीतिक घटक असतात.

१) रागस्वरुप
२) बंदिशीचा मुखडा

३) मुखड्याची सम
४) बंदिशीतील स्वर आणि शब्द यांचा एकत्रित परिणाम
५) बंदिशीचा अंतरा
६) बंदिशीतील तालाचा विचार
७) बंदिशीतील लय.

### बंदिशीतून होणारा रसाविष्कार :

बंदिशीतून होणारा 'रसाविष्कार' हे बंदिशीचे एक वैशिष्ट्य आहे. साहित्य आणि संगीतात 'रस' संकल्पना मांडली गेली आहे. साहित्यात नवरस सांगीतले आहेत. विविध रसांच्या संकल्पनेतून 'आनंद निर्मिती' हा सूप्त हेतू असतो. राग प्रकृतीमधून विशिष्ट रस निर्माण होतो. ही कल्पना मनाशी धरुन त्या रसाशी संबंधित काव्यही बरेच वेळा निर्माण होते. कंठ संगीतात तो रस व्यक्त करतांना बरीचशी मदत होते.[४]

### बंदिशीतील शब्दांची निवड आणि साहित्यिक मूल्ये :

१) शास्त्रीय संगीतात विद्वान गायकांच्या मते स्वर पुढे आणि शब्द मागे असतात.[५]
२) कंठसंगीतात जिथे शब्दांचा वापर होतो, तेथे जे भाव व्यक्त केले जातात ते प्रामुख्याने काव्याशयातील भावच असतात. त्यामुळे ख्याल शैलीत जरी रागसादरीकरण होत असले तरीही त्या रागाची प्रकृती, त्या स्वरावलीतून निर्माण होणारा रसभाव काहीही असो, तो कंठातून व्यक्त करण्यास काव्याची आवश्यकता असते.
३) काव्याचे स्थान रागमांडणीत दुय्यम असले तरी चांगल्या दर्जाचे काव्य रागसादरीकरण प्रभावी होण्यास उपयुक्त ठरते.

### बंदिशीचे विषय आणि भाषा :

पारंपारिक बंदिशीचे विषय, क्षेत्र मर्यादित होते. भक्ति, उपदेश, मंगल प्रसंग, ऋतूवर्णन इ. सामान्य मानवी व्यवहाराशी संबंधीत विषयांवर तर कधी - कधी संगीत शास्त्राच्या सामान्य विषयांवर आधारित रचना बनविल्या जातात.

हिंदी भाषेव्यतिरिक्त इतर भाषांतही बंदिशी रचण्याच्या दृष्टिकोनातून वैचारिक आंदोलन झाले. मराठी भाषिक लोकांसाठी मराठीतच बंदिशी बनविण्याचे प्रयत्न झालेत मात्र ते अल्पायू ठरले. वास्तविक ब्रजबोली तसेच राजस्थानी, बिहारी हिंदी बोली तसेच पंजाबी सोडल्यास इतर भाषांतून बंदिशी रचण्याचे प्रमाण अगदी नगण्यच आहे.

हिंदुस्थानी संगीताच्या स्वभावात एक शांतपणा धीर गंभीरपणा, दरबारी शान, मस्ती, लवचिकपणा तसेच शौकिनीवृत्ती आहे. आणि हे सर्व गुण हिंदी भाषेत असल्यामुळेच कदाचित असे असावे.[६]

उपर्युक्त गुण ज्या बोली भाषेत असतील त्या मध्ये ख्याल बांधणे शक्य आहे.

लय ताल मात्रांच्या दृष्टिने बंदिशींचा विचार -

बंदिशीतील सौंदर्य विविध बाबींवर अवलंबून असते. लय, ताल, मात्रा या घटकांचा विचार स्वर व रागाच्या बरोबरीनेच करावा लागतो. स्वर आणि लय हे दोन्ही घटक एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

बंदिश सादर करतांना सादरीकरणाचा साठीचा जेवढा वेळ लागत असेल तो मोजण्यासाठी वापरलेल्या मात्रा व ताल तसेच शब्द उच्चारणासाठी लागलेली लय तेव्हढीच महत्त्वाची असते.

काव्यातील आकार, अकार, एकार, इकार असणाऱ्या अक्षरांच्या संयोगामुळे एक आगळे वेगळे सौंदर्य निर्माण होते. ख्याल कर्त्यांनें याचा विचार केल्यास, सखोल पणे विचार केल्यास एक आगळे वेगळे सौंदर्य निर्माण होते.

नादाचे सौंदर्य लयी (ताल) च्या मदतीने सहज प्रस्फूरित होते. म्हणूनच तालाची लय आणि बंदिशीच्या लयीचा समन्वय साधणे खूप आवश्यक आहे. तालाचे खंड पाडणे म्हणजेच तालाची लय तसेच बंदिशीच्या लयीत समन्वय साधणे होय. या बाबींना लक्षात घेऊन बंदिशाचे भाषिक अंगाकडे लक्ष दिल्यास प्रस्तुती करण्यास बंदीश उपयुक्त ठरते. ठेक्याचे वजन, बंदिशीची भाषा गेयता इ. एका सूत्रात बांधल्यास एक होतात. म्हणूनच वाग्येयकारांनी विविध तालांचे वजन लक्षात घेऊन बंदिशी रचावयास पाहिजेत.

वाक्, गेयता तसेच लयीसोबत बंदिशीच्या मुखड्याकडे देखील लक्ष द्यावयांस हवे. मुखडा अत्यंत आकर्षक तर असावाच शिवाय लयीच्या दृष्टीने लवचिक देखील असावा.

समेवर येतांना वेगवेगळ्या पद्धतीने कधी वेगाने, कधी मूळ लयीत, कधी दीडपटीने कधी दुपट्टीने यावे. ख्यालगायनाचे हे वैशिष्ट्य आहे.

ख्यालगायनाचे वैशिष्ट्य बंदिशीच्या उत्स्फूर्त अविष्कार आणि विस्तारात आहे. ख्याल विस्ताराची खुबी तिच्या बंदीशींतच आहे.

काही लोक बंदिशीच्या स्वरुपास ख्यालाचा आधार मानीत नाहीत. ते रागात प्रयुक्त स्वरांना अंगाच्या दृष्टीने रागाची बढत करतात. काही कलाकार रागाच्या स्वरांना क्रमाने प्रस्तृत करण्यासच ख्याल गायनाचे स्वरूप मानतात. ते खंडमेरु किंवा मेरुखंडाच्या रीतीने बढत करतात.

रागविस्तार करतांना केवळ आधार म्हणून शब्दांना मानतात. बंदिशीकडे न बघता केवळ रागालापासारखेच त्यांचे गायन असते. ते स्वररचनेस प्राधान्य देऊन ख्याल गायन करतात. त्यांचे गायन धृपदाच्या नोमतोम कडेच झुकेल.

ख्यालगायन हे दोन्हींचा मध्य आहे. रागालापाद्वारेच तिची निर्मिती झाली आहे. ख्यालगायनात बंदीश सर्वोपरि आहे. राग एक असला तरी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून रागाच्या व्यक्तित्त्वाला परखण्याचा अनुभव आपल्याला ख्यालगायनाद्वारेच मिळतो. म्हणूनच बंदीश ख्यालाचे प्राणतत्त्व आहे.

### निष्कर्ष :

१) हिंदुस्थानी राग संगीताचे दोन मुख्य आधार आहेत. ते म्हणजे १) बंदीश २) उपज
२) ख्याल गायनाचे स्थान धृपद आणि ठुमरीच्या मधोमध आहे.
३) व्यक्तीत असलेल्या गुणांचा तसेच इतर बाबींचा एकत्रित अनुभव म्हणजे व्यक्तिमत्व. राग ही एक पूर्ण आकृती आहे. या आकृतीमध्ये रागास आवश्यक त्या विविध स्वराक्षरांच्या मदतीने निर्माण झालेल्या स्वराकृतीचे शास्त्रीनुसार चलनाप्रमाणे नियोजन, तालावर्तनाच्या चौकटीत दोन मात्रांतील अवकाशाने निर्माण झालेली लयाकृती, या

आकृतीचा काव्याशयातील भाव व्यक्त करण्यास केलेला उपयोग इ. चा परिणाम म्हणजे रागाचे व्यक्तिमत्व.
४) हे 'राग व्यक्तिमत्व' व्यक्त करण्यासाठी बंदिशीची आवश्यकता असते. त्यास शब्दांची आवश्यकता असते. शब्दांमध्ये गेयतत्व असते. गेय शब्द समूहातून जे काव्य निर्माण होते. त्यातील आशय राग प्रस्तुतीत सौंदर्य वाढविण्यासाठी पूरक असतो. हे बंदिशीच्या सहाय्याने अधिक स्पष्ट होते.
५) बंदीशीच्या रचनेत स्वर, लय, शब्द या तिर्हींचा तालावर्तनाची चौकट म्हणून उपयोग केल्यास बंदिशीचे सौंदर्य उलगडत जाते.
६) ख्याल शैलीच्या बंदिशीला मुखडा ही एक अनोखी देणगी आहे.
७) बंदिशीतील 'सम' हा महत्वाचा बिंदू आहे. तो उत्कर्षबिंदु तसेच विसर्जन बिंदूही असतो.
८) ख्यालाच्या सादरी करणात रागविस्तारासाठी बंदिश माध्यम म्हणून वापरली जाते.
९) बंदिश निर्मितीत रागरुपबध्द करतांना 'व्यापकता' आणि 'विस्तार' या दोन अंगभूत गुणाधारे रागाकृती विस्तारीत होत असते.
१०) बंदिशीतील विविध स्वरांचे सुप्रमाणित व सुसंवादित एकत्रीकरण आणि त्यातुन निर्माण झालेले सौंदर्य कलाकाराला अनुभवता येते.
११) सौंदर्य निर्मितीचे निरनिराळे आकृतीबंध निर्माण होणे ही प्रक्रिया म्हणजेच बंदिश निर्मितीचा पहिला टप्पा होय.
रसनिर्मितीच्या प्रक्रियेसाठी स्वरनियोजना बरोबरच काव्यविषय आशयही महत्वाचा आहे.

## संदर्भ :


१) संगोराम श्रीरंग, मुक्त संगीत संवाद पृ.२१५
२) तत्रैव पृ. २१५
३) तत्रैव पृ. २१८
४) मादुस्कर स्मिता, भारतीय संगीतातील दोनरंग, पृ. १२८
५) तत्रैव पृ. १३०
६) भातखंडे, वि.ना. हिंदुस्थानी संगीत पध्दती भाग -६ क्रमिक पुस्तक मालिका, प्रस्तावना पृ. ९


## संदर्भग्रंथ :


१) आठवले, वि. रा. (२००८( नादचिंतन), संस्कार प्रकाशन, मुंबई
२) भातखंडे, वि.ना.(पब्लिकेशन नं. ७३/३३, १९९१), क्रमिक पुस्तक मालिका, संगीत कार्यालय, हाथरस
३) मादुस्कर, स्मिता पतंजलि (२०१४), भारतीय संगीतातील दोन रंग, सदारंग - अदारंग, सुनिधि पब्लिशर्स, पुणे - ३०
४) संगोराम श्रीरंग (१९८८), 'मुक्तसंगीत संवाद', प्रकाशक, गानवर्धन संस्था, पुणे
५) फाटक, किरण भास्कर (२००५), राग, संस्कार प्रकाशन, मुंबई.
६) अत्रे प्रभा (१९९२), सुस्वराली, बुकमार्क पब्लिकेशन्स, पुणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org